
तुरुंगातली परी

एलिजाबेथ फ्राई




तुरुंगातली परी

एलिजाबेथ फ्राई


मराठी : अश्विनी बर्वे

खूप पूर्वी इंग्लडमध्ये न्युगेट जेल नावाची भयानक जागा होती. कायदा तोडणाऱ्या लोकांना या तुरुंगात ठेवत असे. न्यू गेटच्या कैद्यांना झोपण्यासाठी पलंग आणि अंथरूण वगैरे काही नव्हतं. जेव्हा ते आजारी पडत तेव्हा त्यांच्या औषधे घ्यायची सोय नसे. आणि ते नेहमी भुकेले असत.



लोकांना न्यूगेटमधल्या कैद्यांची काही पर्वा नव्हती. काही लोक तर हे सुद्धा म्हणत, “ते कैदी चांगले अन्न आणि कपड्यांचे हकदार नाहीत.” पण काही लोकांना त्या कैद्यांचे हाल बघवत नसत.त्यांना या गोष्टीचे सगळ्यात जास्त दुःख होत असे की मुलांना त्यांच्या आयांबरोबर तुरुंगात राहावे लागे. पण ज्यांना याबद्दल काळजी वाटत होती, त्यांनी याबद्दल काहीच केले नाही.त्यांनी त्याबाबत फक्त गप्पा मारल्या आणि तक्रारी केल्या. खूपलोक लोकांनी एवढंच म्हटलं की, “आम्हांला माहित नाही, काय करावं ते?”






शेवटी एका महिलेने याबाबत काही केलं. तिचं नाव होतं, एलिजाबेथ फ्राई. एलिजाबेथ फ्राईने तुरुंगातील भयानक स्थिति बद्दल ऐकलं. त्यामुळे ती दुःखी झाली आणि तिला रागही आला. तिला वाटलं की देव तिच्या साहय्याने कैद्यांना मदत करू इच्छितो. तिला हे ही माहित होतं की कोरड्या बाता मारून कोणतीही समस्या सुटत नाही. म्हणून तिने ठोस योजना तयार केली. दुसऱ्या दिवशी, एलिजाबेथने एका मित्राला आपल्या योजनेबद्दल सांगितलं. "मला माहित आहे की न्यूगेट जेलमध्ये महिलांना मदत कशी केली जाऊ शकते," ती म्हणाली, "मी महिला कैद्यांना भेटायला जाईन.त्यांच्यासाठी कपडे, जेवण, कांबळे आणि औषधे घेवून जाईन. मी बायबल सुद्धा घेवून जाईन आणि त्यांना देवाच्या प्रेमाबद्दल सांगेल. याबाबत तुझा काय विचार आहे? एलिजाबेथ ने आपल्या मित्राला विचारलं. (एलिजाबेथ फ्राई क्वेकर पंथाची होती) मग एलिजाबेथने विचारलं, "तुम्ही माझ्याबरोबर जेल मध्ये याल का?" "मला वाटतं तुझं डोकं बिघडलं आहे?" एलिजाबेथची मैत्रीण म्हणाली, "त्या महिला म्हणजे जनावरं आहेत, जर तू तिथं गेली तर त्या तुझे केस ओढतील, तुला ओरबडतील." "मला नाही वाटत माझ्या बरोबर काही वाईट घडेल असं. मी कैद्यांना सांगेन मी त्यांची मैत्रीण आहे," एलिजाबेथ ने शांततेने उत्तर दिलं. "मी त्यांना विचारेन मी त्यांना कशी मदत करू शकते, मी उद्या तिथं जाणार आहे, तुला यायचं की नाही ही तुझी मर्जी!"



दुसऱ्या दिवशी, एलिजाबेथ फ्राईने गाडीत बसून न्यूगेट जेलकडे प्रस्थान केले. कैद्यांना आणि त्यांच्या मुलांना देण्यासाठी दोन मोठ्या टोपल्या भरून सामान ती घेवून गेली होती. मग ती जेल मधल्या महिलांच्या विभागापर्यंत पायी चालत गेली आणि तिथं पोहचल्यावर तिने दार वाजवले.





“तुम्ही कोण आहात आणि तुम्हांला काय पाहिजे? जेल गार्डने विचारले. (इंग्लड मध्ये गार्डला ‘टर्नकी’ म्हणतात कारण ते कुलुपात किल्ली फिरवतात.)

“मी एलिजाबेथ फ्राई आहे," एलिजाबेथने उत्तर दिले. “मी महिला कैदी आणि त्यांच्या गरीब मुलांना भेटायला आले आहे. मी मुलांसाठी कपडे आणले आहे. त्याचबरोबर जेवण, औषधे आणि कांबळे सुद्धा आणले आहे.”

“तुम्ही जेल मध्ये जावू शकत नाही” गार्ड म्हणाला. “हे नियमांच्या विरुद्ध आहे. आणि त्याची काही कारणं सुद्धा आहेत. या जेल मध्ये आगंतुकाबरोबर भयानक प्रकार घडले आहेत. नाही मी तुम्हांला आत जाऊ देणार नाही. तुम्ही आणलेल्या वस्तू माझ्याकडे द्या. मी नंतर कैद्यांना वाटेल.”

“मी अजिबात असं करणार नाही,” एलिजाबेथ फ्राई निश्चयाने म्हणाली. “मी जेलच्या कैद्यांना भेटायला आले आहे आणि त्यांना मी जरूर भेटेन. तुम्हांला ते आवडो अथवा न आवडो. कृपया मला आत जाऊ द्या.”



गार्डने आश्चर्याने भुवया उंचावून एलिजाबेथकडे बघितले. चांगले कपडे घातलेल्या महिला जेलच्या जवळ भटकत नसत. पण ही एक अजब स्त्री आहे जी आत जाण्याचा हट्ट करत होती. “बरं ठीक आहे,” शेवटी गार्ड म्हणाला. “मी तुम्हांला आत जाऊ देईन पण तुमच्याबरोबर आत येणार नाही. मी कधी एकटा आत जात नाही, नेहमी मी कमीत कमी दोन गार्ड बरोबर घेवून जातो. आता जातांना आम्ही सुरक्षेसाठी मोठी काठी बरोबर ठेवतो. जर तुम्हांला कोणी त्रास दिला तक्रार करायची नाही.” त्यानंतर गार्डने एका मोठ्या किल्लीने लोखंडाचा मोठा दरवाजा उघडला. एलिजाबेथ दरवाज्यातून आत घुसली, मागून गार्डने परत दरवाज्याला कुलूप लावलं.





"ज़रा, इकडे बघा, “एक महिला कैदी जोरात ओरडली, “एक सभ्य स्त्री आपल्याला भेटायला आलीई आहे. हा! हा! हा!" ती ओरडली. तेव्हा दोन कैद्यांनी एलिझाबेथची टोपली जोरात ओढली. “तू इथं काय करत आहे?” एका महिला कैदीने रागाने विचारले. “आम्हांला तुमच्यासारखे लोक आवडत नाहीत.”

एलिझाबेथ फ्राईला काय करावं ते काही समजले नाही. आता ती थोडी घाबरली, जर महिलांनी तिच्यावर हल्ला केला तर काय होईल?”



आत गेल्यावर एलिजाबेथने स्वतःला एका सुनसान, दुर्गंधीयुक्त खोलीत उभं असलेलं पाहिलं. त्याच्या चारी बाजूला एक भयानक आवाज ऐकू येत होता. तिथं एक आजारी स्त्री रडत होती आणि ओरडत होती. मुलं भुकेने तिला बिलगले होते. एक कोपऱ्यात काही स्त्रिया खाण्याच्या एका तुकड्यासाठी आणि कपड्याच्या एका तुकड्यासाठी भांडत होत्या. “ते माझ्या मुलाचे कांबळे आहे, “एक महिला ओरडली, “ते लगेच परत करत.” “तू ते घ्यायचा प्रयत्न तर कर, मी तुझे डोळे ओरबाडेन!”

अचानक, तिला एका रडणाऱ्या बाळाचा आवाज ऐकू आला. बाळ नंग होतं, त्याच्याजवळ कोणतेही कपडे नव्हते. आणि ते थंडीने कापत होते. एलिझाबेथला रडणारे मुल बघून एवढी द्या आली की तिची भीती गायब झाली.

एलिझाबेथने आपली टोपली खाली ठेवली आणि ती रडणाऱ्या मुलाच्या जवळ गेली. तिने हळूच त्या मुलाला उचलले आणि त्याच्या पाठीवर थोपटले. मग तिने आपल्या टोपलीतून एक शर्ट आणि चड्डी काढली आणि त्याला बाळाला घातली. मुलाचे रडणे लगेच बंद झाले. मग जेल मध्ये एकदम शांतता पसरली. आता पुढे काय होणार याची सगळेजण वाट पाहू लागले.

“बहिणीनो," एलिझाबेथने बोलायला सुरुवात केली. “मी एलिजाबेथ फ्राई आहे. मला तुमच्याबरोबर मैत्री करायला आवडेल.मी असं ऐकलं की जेल मधले आपले जीवन खूप कठीण आहे. मला तुम्हांला मदत करण्याची इच्छा आहे. मी असं ऐकलं की तुमच्या मुलांकडे पुरेसे कपडे नाही. म्हणून मी त्यांच्यासाठी काही कपडे आणले आहेत. मी असं ऐकलं की तुम्हांला पोटभर अन्न मिळत नाही. म्हणून मी थोडंसं खायला आणलं आहे. तुम्हांला अजून काय हवं आहे? मी तुमच्यासाठी अजून काय करू शकते?”

एलिझाबेथचे बोलणे ऐकून महिला आश्चर्यचकित झाल्या. आजपर्यंत त्यांना कोणीही विचारले नव्हते, त्यांना काय पाहिजे ते?






शेवटी एक युवती पुढे आली, “आम्हांला खायला पाहिजे,” ती म्हणाली. “आणि आम्हांला कपडे पाहिजे. पण आमची सगळ्यात मोठी गरज म्हणजे आम्हांला काही उपयुक्त काम पाहिजे. आम्ही इथे इतके उबून गेलो आहोत की दिवसभर आम्ही फक्त एक दुसऱ्याशी भांडतो आणि ओरडतो.” अजून एका महिलेने आपल्या छोट्या मुलीला पुढे केले, “माझी छोटी मुलगी सात वर्षाची आहे,” ती म्हणाली, “तिला सांभाळायला कोणी नसल्याने ती माझ्या बरोबर या सडक्या जागेत राहावे लागते. मला भीती वाटते की ती ही माझ्यासारखी बिघडून जाईल. जर ती शिकू शकली तर? पण आमच्याकडे कोणतीही पुस्तके नाहीत. तुम्ही पुस्तके आणू शकता का?

“हो," एलिझाबेथ फ्राई म्हणाली. “माझ्या लक्षात येतंय की तुमच्या आणि मुलांच्या भरपूर गरजा आहेत. चला आपण सगळेजण बसून त्याविषयी बोलू या.”



एलिझाबेथ आणि महिला कैद्यांनी दुपारभर गप्पा मारल्या आणि एक योजना बनवली. शेवटी एलिझाबेथ म्हणाली, “आता मला जायला पाहिजे, पण जाण्याच्या आधी मी तुम्हांला बायबल मधले काही वाचून दाखवते. “ईश्वर आपला आश्रयदाता आहे आणि तोच आपली शक्ती आहे,” एलिझाबेथने वाचले, “संकटाच्या वेळी तोच नेहमी आपल्याला मदत करायला येतो.”





सगळ्या महिला कृतज्ञ होत्या.याआधी त्यांना कोणीही बायबल वाचून दाखवले नव्हते. आता त्या बघू शकत होत्या की संकटाच्या वेळी ईश्वर त्यांना जरूर मदत करेल. ईश्वरानेच तर एलिझाबेथला त्याच्याकडे पाठवले नव्हते?






घरी आल्यावर एलिजाबेथ आपल्या मैत्रिणीकडे गेली. “आपल्याला तिथं काय काय करता येईल?” ती म्हणाली. “आपल्याला जेल स्वच्छ करण्यासाठी महिलांना मदत करता येईल. तिथं खूप घाण आहे. मुलांसाठी एक शाळा सुरु करता येईल. आणि आपण त्या महिलांना शिवणकाम शिकवू शकू. आपल्याला खूप वस्तूंची गरज आहे – जसे की – झाडू-पोछा,बादल्या, पुस्तके, कागद, पेन्सिली, कपडा, दोरे, सुया, इत्यादी. तुम्ही लोक यातील काही वस्तू घेवून न्यूगेटजवळ मला भेटू शकाल का? एलिजाबेथ च्या मैत्रिणी तिला मदत करायला तयार झाल्या. दुसऱ्या दिवशी, जेव्हा एलिजाबेथ फ्राई आणि तिच्या मैत्रिणी जेल मध्ये भेटल्या. तेव्हा गार्डने वाद न घालता त्यांना आत जाऊ दिले, “देव तुमचे भलं करो,” तो महिलांना म्हणाला.



“हॅलो! या आपल्या मैत्रिणी आहेत, एलिजाबेथ फ्राई. ती आमची परी आहे!” महिला कैदी भावूक होत म्हणाल्या. “तू काय आणलं? तुझ्याबरोबर या स्त्रिया कोण आहेत?”

“या महिला इथं मदत करण्यासाठी आल्या आहेत,”एलिजाबेथ म्हणाली.“ त्या आपल्या मैत्रिणी आहेत. आम्ही सफाई करण्यासाठी सामान आणलं आहे. आम्ही तुमच्या मुलांसाठी शाळा सुरु करण्यासाठी पुस्तके आणली आएहत.पण त्यांना एका शिक्षकाची गरज भासेल. तुमच्यापैकी कोणाला लिहता-वाचता येतं का?” “मला येतं,” एक लाजाळू तरुणी म्हणाली. “मी शाळेची शिक्षिका होईन. असं केल्यामुळे मी पापाचे प्रायश्चित्त घेवू शकेल.” “ठीक आहे!” एलिझाबेथ म्हणाली, “आपण आजपासून शाळा सुरु करू या.”








सगळ्यांनी मदत केली.काही महिला साबण आणि पाणी घेवून साफसफाई करायला गेल्या.इतरजणींनी शाळेसाठी खुर्ची-टेबल आणि पुस्तकांची मांडणी याची व्यवस्था केली. लवकरच मुलं आपआपल्या कामात व्यग्र झाले. आता जेलच्या भिंती आणि फरश्या इतक्या भकास वाटत नव्हत्या.

"बघा" एलिजाबेथ म्हणाली. "आपल्याजवळ सुई, दोरा आणि कपडा सुद्धा आहे. आता तुम्ही शिवणकाम शिकू शकतात. आणि मग तुम्ही तुमचे कपडे शिवू शकतात. मी तुम्ही केलेल्या वस्तू विकण्यासाठी तुम्हांला मदत करेन. त्यामुळे तुमच्याजवळ तुम्हांला हव्या असणाऱ्या वस्तू घेण्यासाठी पैसे राहतील." हे सगळं बघून महिला उत्साहित झाल्या. जेल मधून बाहेर पडल्यावर त्या आपली उपजिविका करू शकत होत्या. मग त्यांना चोरी करण्याची गरज राहणार नाही.



एलिजाबेथ फ्राई आणि तिच्या मैत्रिणी रोज जेल मध्ये जात आणि महिला कैद्यांबरोबर बराच काळ घालवत. कैदी सुंदर दुलई आणि मुलांचे कपडे आणि फ्रॉक शिवायल शिकल्या. एलिजाबेथने त्यांच्या वस्तू विकल्या. तिने ते पैसे कैद्यांना दिले. रोज एलिजाबेथ बायबल मधून रोज त्यांना काही वाचून दाखवत असे. कैद्यांना बायबल मधल्या गोष्टी ऐकणे आवडत होते. त्या शिकल्या की देव खरंच त्यांच्यावर खूप प्रेम करतो. त्यांनी देवाच्या मार्गाने चालण्याची शिकवण पण घेतली. एलिजाबेथ फ्राई जे काही करत होती त्याची बातमी पूर्ण इंग्लडभर पसरली.लवकरच खूप महत्वाचे लोक एलिजाबेथला तिच्या यशाचे रहस्य विचारू लागले. त्या लोकांना कैद्यांना मदत करायची होती. एलिजाबेथ फ्राई म्हणाली, “माझं रहस्य सरळ आहे,मी कैद्यांना सांगते की देवाचे त्यांच्यावर प्रेम आहे. त्यांना काय पाहिजे हे मी त्यांना विचारते.”



एलिजाबेथ कुरनई फ्राई (१७९०-१८४५), एक गंभीर धार्मिक, आणि दृढ निश्चयी महिला होती. ती आपल्या काळात एक चमत्कारिक समाज सुधारक होती. आजच्या काळात तिला खूप प्रभावशाली मानले जाते. त्यांनी पूर्ण इंग्लडमध्ये जेलमध्ये सुधारणा लागू केल्या. त्यांनी संसदे समोर व्यक्तिगतरीत्या पुरावा दिला आणि जेल सुधारणा कायदा पारित होण्यासाठी आणि लागू होण्यासाठी काम केले. मोठ्या प्रमाणावर जेल सुधारण्याचे काम करत असतांना देखिल एलिजाबेथ फ्राईने व्यक्तिगत रूपाने कैद्यांना आणि त्यांच्या समस्यां जाणून घेणे त्यांनी सोडले नाही.त्या त्यांना भेटायला जात राहिली. त्यांचे जेवण आणि इतर गरजांचा प्रबंध करत होत्या. त्यांना नैतिक आणि आध्यात्मिक शांतता देत राहिल्या आणि बाहेर आल्यानंतर त्यांनी जीवनात रस घ्यावा म्हणून त्यांना सतत भेटत होत्या. फाशीच्या आधली पूर्ण रात्र त्या कैद्यांबरोबर राहत असत. जरी एलिजाबेथ फ्राई यांना मुख्यतः जेल सुधारण्याच्या कामासाठी ओळखले जात असले तर त्यांनी त्यांच्या जीवनात अनेक कामं केली. एलिजाबेथ, क्वेकर म्हणून मोठ्या झाल्या होत्या. पण त्यांच्या परिवाराने क्वेकर धर्माच्या नियमांचे कडक पालन केले नाही. त्यांनी व्यवहारी जगाला मान्यता दिली. सतराव्या वर्षी, एलिजाबेथचे एक धार्मिक म्हणून रुपांतर झाले आणि आपल्या जीवनाचे सार्थक करण्याची शपथ त्यांनी घेतली.

त्यांनी वडिलांकडून मिळालेल्या संपत्तीमधून गावच्या गरीब मुलांसाठी शाळा सुरु केली. त्यांनी शेजारचे आजारी आणि गरीब लोकांची सेवा केली आणि त्यांचे पालनपोषण केले.

जेव्हा जोसेफ फ्राई यांनी प्रथम एलिजाबेथच्या समोर लग्न करण्याचा प्रस्ताव ठेवला तेव्हा तिने नकार दिला कारण तिच्या जीवनाचे ध्येय धर्मार्थ काम करणे हेच होते. जोसेफने वचन दिले की लग्नानंतर एलिजाबेथच्या ईश्वर-प्रदत्त, सेवा कार्यात ते हस्तक्षेप करणार नाही. नंतरच्या काळात जोसेफ ने जेल सुधार कार्यात एलिजाबेथला मदत केली.

एलिजाबेथ आणि जोसेफ फ्राई यांना बारा मुलं होती. पण आपल्या एवढ्या मोठा परिवार असूनही एलिजाबेथ ने आपला वेळ, धन आणि ऊर्जा यांचे दान करण्यात कुचराई केली नाही. तिने कमीत-कमी दोन शाळांची स्थापना केली, आजारी लोकांची सेवा केली. क्वेकर चर्च मध्ये एक मंत्री झाली. आणि फाशीची शिक्षा रद्द व्हावी म्हणून सतत प्रयत्न केले. आणि त्याचबरोबर इंग्लड मध्ये मोफत (सार्वजनिक) शाळांची सुरुवात केली.

एलिजाबेथ फ्राईने खरंच येशूच्या शिकवण अवलंबली. तिने भुकेल्यांना खायला दिलं, आजारी कैद्यांचे सांत्वन केले.

समाप्त